अतितात्काळ/कालमर्यादा

क्रमांक.पोअवा/आस्थालि/बॉडीमास/2911/२०१७
कार्यालय, पोलीस अधीक्षक, वाशिम.
वाशिम, दिनांक :– 11 APR 2017

विषय :– **पोलीस बलातील विहीत शारिरिक क्षमताधारक पोलीस अधिकारी/कर्मचारी (पोलीस शिपाई ते पोलीस निरीक्षक या संवर्गातील) यांच्यासाठी प्रोत्साहनभत्ता योजना राबविण्याबाबत.**

—०००—

उपरोक्त विषयाचे अनुषंगाने कळविण्यात येते की, पोलीस बलातील विहीत शारिरिक क्षमताधारक पोलीस अधिकारी/कर्मचारी (पोलीस शिपाई ते पोलीस निरीक्षक या संवर्गातील) यांच्यासाठी प्रोत्साहनभत्ता योजना राबविण्याबाबत शासन आदेश असून ही योजना सर्वस्वी ऐच्छिक स्वरुपाची आहे. त्या अनुषंगाने या योजनेचा लाभ आपल्या पोलीस स्टेशन/शाखा/पोलीस मुख्यालयातील **ज्या पोलीस अधिकारी व कर्मचारी (पोलीस शिपाई ते पोलीस निरीक्षक या संवर्गातील)यांना घ्यावयाचा आहे व ज्यांचे वय दिनांक ३१.१२.२०१६ रोजी ३० वर्ष पूर्ण किंवा त्याहून अधिक आहे.** अशा पोलीस अधिकारी/कर्मचारी यांच्याकडून "ते सदर योजनेचा लाभ घेण्यास इच्छुक असल्याबाबत" त्यांनी **"माँ गंगा मेमोरिअल,** बाहेती हॉस्पीटल, वाशिम" येथे दिनांक १०/०४/२०१७ ते दिनांक २०/०४/२०१७ पर्यन्त सकाळी १०.३० ते दुपारी ०१. **३० वाजेपर्यंत उपस्थित राहून बॉडीमास इंडेक्सबाबत वैद्यकीय तपासणी करून घ्यावी. सदरचे प्रमाणपत्र नेमणुकीचे ठिकाणी जमा करावेत.**

२/– त्याचप्रमाणे सर्व संबंधीत अधिकारी/कर्मचारी यांनी त्यांचे जन्मतारखेचा/वयाचा तसेच सदर योजनेचा लाभ घेण्यासाठी ते ३० वर्ष वयाची अट पूर्ण करीत आहे. याबाबतचा पुरावा करीता आपले आयकार्ड सोबत घेवुन जातील. तसेच जे पोलीस अधीकारी/कर्मचारी जे दिनांक १०/०४/२०१७ ते दिनांक २०/०४/२०१७ पावेतो प्रोत्साहन भत्ता करीता उपस्थित राहणार नाही. त्यांना सदर योजनेच्या लाभासाठी त्यांचा विचार केला जाणार नाही. याची सर्व अधिकारी /कर्मचारी यांना समज द्यावी. तसेच जे अधिकारी/कर्मचारी अर्जित रजेवर/ सिक मध्ये असतील त्यांना कळवून तशी नोंद स्टे.डायरी मध्ये घेण्यात यावी. ज्या अधिकारी / कर्मचारी यांनी मुदतीचे आंत बॉडी मॉस इंडेक्स मुदतीचे आंत न केल्यास त्यांचा प्रोत्साहन भत्ता करीता विचार केला जाणार नाही. अशा अधिकारी कर्मचा–यांचे प्रमाणपत्र मुदत संपल्यानंतर या कार्यालयास पाठविण्यात येवु नये याची नोंद घ्यावी.

३/– तसेच सर्व ठाणेदार / सर्व शाखा / राखीव पोलीस निरीक्षक पोलीस मुख्यालय, वाशिम यांनी पोलीस अधिकारी/कर्मचा–यांचे बॉडी मॉस इंडेक्स चे प्रमाणपत्र एकत्रित रित्याने दिनांक २१/०४/२०१७ पर्यंत या कार्यालयास सादर करावे. या बाबतची सुचना नोटीस बोर्डवर लावण्यात यावी व संध्याकाळी/रात्रीचे गणनेवर दयावी तशी नोंद स्टे.डायरी मध्ये घेण्यात यावी.

(प्रशांत होळकर)
पोलीस अधीक्षक, वाशिम

प्रत.

उपविभागीय पोलीस अधिकारी, वाशिम/मंगरूळपीर/कारंजा ठाणेदार,वाशिम शहर/वाशिम ग्रामीण/मालेगाव/शिरपुर/रिसोड/मंगरूळपीर/आसेगाव/अनसिंग/जउळका/कारंजाशहर/कारंजा ग्रामीण/मानोरा/धनज /पोनि., शवाशा/जिवाशा/स्थागुशा/जिवीशा/पोअ.,वाचक शाखा/अपोअ.,वाचक शाखा/ मोपवि/मसुप/ अमानी/बीडीडीएस/कल्याण/तंटामुक्ती/नियंत्रणकक्ष/श्वान पथक/बिनतारी संदेश/रापोनि., पोलीस मुख्यालय, वाशिम.

प्रत :– संगणक कक्ष /डिपीजी लिपीक पो.अ.कार्यालय, वाशिम.

२/– संगणक कक्ष यांनी सदरचे ज्ञापन सर्वा करीता पोलीस अधीक्षक, वाशिम यांचे संकेतस्थळावर सर्वाकरीता उपलब्ध करून देण्यात यावे. तसेच सर्व उपविभागीय पोलीस अधीकारी/सर्व ठाणेदार/सर्व शाखा/रापोनि.,पो.मु.,वाशिम यांना त्वरीत "ई–मेल" द्वारे कळवावे.

प्रत माहितीस :–

डॉ.हरीश बाहेती माँ गंगा मेमोरिअल, बाहेती हॉस्पीटल, वाशिम.

२/– आपणास कळविण्यात येते की, आपल्याकडे येणा–या पोलीस अधिकारी / कर्मचारी यांची उंची/वजन मोजुन वैद्यक शास्त्रानुसार विहीत केलेल्या पध्दतीप्रमाणे तपासणी करून त्यांना सदर प्रमाणपत्र देवुन एक स्वतंत्र लिस्ट तयार करून गोपनिय रित्याने एक प्रत पोलीस अधीक्षक, वाशिम यांचे नावे बंद लिफाफा मध्ये बंद करून दि.२१/०४/२०१७ रोजी या कार्यालयास पाठविण्यात यावे हि विनंती.